# प्रेसनोट

जा.क्र. ९५७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ५/०४/२०१८

## ''अनैसर्गिक संभोग करणाऱ्या आरोपीस दहा वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे लाखांदुर अंतर्गत ग्राम चप्राड येथिल आरोपी नामे चक्रधर रामाजी बघमारे, वय २५ वर्ष, रा. चप्राड ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा याने अल्पयीन पिडित मुलाचे अनैसर्गिक संभोग केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ५.०४.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा. यांनी आरोपीस १० वर्ष सश्रम कारावास व २०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २३.१२.२०१५ ला तक्रारदार यांनी पोलीस ठाणे लाखांदुर येथे तक्रार दिली की, पिडित मुलगा वय ११ वर्ष हा घरा शेजारी मुलांसोबत खेळत होता व जवळच तेरवीचा कार्यक्रम असल्याने सायंकाळी ७.०० वा. दरम्यान तेरवीचे ठिकाणी मुलांसोबत जेवणाकरीता गेला होता. परंतु घरी परत न आल्याने परिसरात विचारपुस करून शोध घेतला दिसुन आला नाही म्हणुन तक्रारदार हा घरी परत आला रात्री अंदाजे ७.४५ वा. सुमारास अल्पवयीन पिडित मुलगा हा रडत घरी आला त्याचे अंगावर कुठलेही कपडे नव्हते, तक्रारदार याने अल्पवयीन पिडित मुलास काय झाले असे विचारले असता त्याने गावातील एका मुलाने भाउराव वासनिक याचे शेताकडे नेवुन बळजबरीने माझे अंगावरील कपडे काढुन माझे गुद्दद्वारात लिंग टाकले त्यामुळे गुद्दद्वार दुखत आहे असे सांगीतले. सदर आरोपी बाबत अधिक विचारपुस केली असता गावातील एका मुलाने पिडित हा आरोपी चक्रधर बघमारे याचे सोबत जातांना दिसल्याचे सांगीतले पिडित मुलास विचारले असता त्याने सदर आरोपीनेच आपले सोबत वरील कृत्य केल्याचे सांगीतले सदर घटणेची तक्रार देण्यास तक्रारादार हे पोलीस ठाणे लाखांदुर येथे आला असता तक्रारदार यांचे तक्रारीवरून आरोपी विरूध्द अपराध क्र. ७६/१५ कलम ३७७ भादवि सह कलम ३(१),४ लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण

अधिनीयम २०१२, कलम ३(१)(१२) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, विक्रम साळी यांनी करून गुन्हयातील **आरोपी नामे चक्रधर रामाजी बघमारे, वय २५ वर्ष, रा. चप्राड ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा यास** अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे गोळा करून आरोपी विरूध्द गुन्हयात कलम ३७७ भादवि सह कलम ३(१),४ लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२, कलम ३(१)(१२) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अन्वये आरोप पत्र तयार करून विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५/१६ अन्यवे अतिरीक्त सत्र न्यायाधिश यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आली.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट रमाकांत एन. खत्री, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ५.०४.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे चक्रधर रामाजी बघमारे, वय २५ वर्ष, रा. चप्राड** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३७७ भादवि अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व १०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावास, कलम ३(१),४ लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये सात वर्ष सश्रम कारावास व १०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, बंडोपंथ बन्सोडे, ठाणेदार पोलीस ठाणे लाखांदुर यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सुरेश भलावी पो.स्टे. लाखांदुर यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(एस. आर. तेलुरे)
जि.वि.शा.भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.